**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (पूर्व),**
**ता. वसई, जि. पालघर - ४०१ ३०५.**

प्रगतीचा प्रकाश हाच बहुजन विकास
वसई-विरार शहर महानगरपालिका
स्थापना : ३ जुलै २००९

दूरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म./आ.प्र./३८७/२०२२.
दिनांक : ०१/०४/२०२२.

## आदेश

**विषय :-** दि. ३१/०३/२०२२ च्या शासन महसूल व वनविभाग आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाच्या आदेशातील तरतुदी अन्वये वसई - विरार शहर महानगरपालिकाहद्दीतील निर्बंध शिथील करणेबाबत.

संदर्भ :- १) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५.
२) गृह सचिवांचे मुख्य सचिवांना २२ मार्च २०२२ रोजीचे पत्र, क्रमांक. ४०- ३/२०२०-DM-१ (A).
३) सचिव, आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभाग, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, दिनांक २३ मार्च, २०२२ चे पत्र, क्रमांक D.O. No. Z.२६०१५/१/२०२- DM सेल.
४) शासन महसुल व वन विभाग आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभागाकडील आदेश क्र.डीएमयु/२०२०/सी.आर. ९२ / डीआयएसएम - १, दि. ३१/०३/२०२२.

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यात मार्च २०२० पासून गेल्या दोन वर्षांत कोविड १९ साथीच्या आजाराने थैमान घातले आहे आणि आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ ची अंमलबजावणी राज्यभरात विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यासाठी करण्यात आली आहे. राज्यातील नागरिकांचे जीवन सुरक्षित राहणेसाठी राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या राज्य कार्यकारी समितीने मार्गदर्शक तत्त्वे जारी करणारे विविध आदेश जारी केले आहेत.

ज्याअर्थी, संदर्भ क्र. ४ अन्वये सध्या राज्यातील कोविड रुग्णांची संख्या परिणामकारकरित्या कमी झाली आहे व गेल्या काही आठवड्यांपासून दररोज कोविड पॉझिटिव्ह रुग्णाची संख्या कमी होत आहे. भारत सरकार, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने सुचविल्यानुसार कोविड पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या व बेडची संख्या आवश्यकतेबाबतचे निकर्षाप्रमाणे विहित मर्यादेच्या आत आहे.

त्याअर्थी, संदर्भ क्र. ४ अन्वये प्राप्त निर्देशानुसार वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोविड - १९ च्या अनुषंगाने अनुपालनाबाबत खालील प्रमाणे कळविण्यात येत आहे.

आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ अंतर्गत कोविड - १९ शी संबंधित निर्बंध लादण्यासाठी सध्या अंमलात असलेले असे सर्व आदेश याद्वारे मागे घेण्यात आले आहेत आणि यापुढे १ एप्रिल २०२२ रात्री १२.०० वाजल्यापासून लागू असणार नाहीत.

तथापि, सर्व नागरिक, आस्थापना आणि संस्थांना सल्ला देणेत येतो की, त्यांनी वैयक्तीक व सर्व समाजाच्या आरोग्य व सुरक्षिततेसाठी मास्क वापरणे, सामाजिक अंतर राखणे इत्यादींसह कोविड योग्य वर्तनाचे पालन करणे सुरू ठेवावे.

सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

०१/०४/२२
(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई - विरार शहर महानगरपालिका

Scanned with CamScanner

प्रत: माहितीसाठी :-

१) मा. पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ २ व ३, पोलीस आयुक्तालय मिरा - भाईंदर- वसई - विरार.

प्रत: आवश्यक कार्यवाहीसाठी :-

१) अतिरिक्तआयुक्त (उत्तर व दक्षिण), वसई विरार शहर महानगरपालिका.

२) उप-आयुक्त (सर्व) व उप-आयुक्त, परिमंडळ १, २, ३ .

३) सहाय्यकआयुक्त/ प्र. सहा. आयुक्त (सर्व) / विभागप्रमुख (सर्व) / खातेप्रमुख (सर्व) .

४) जनसंपर्क अधिकारी यांना प्रसिध्दीसाठी.

५) आय.टी. विभाग यांजकडे महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी.

Scanned with CamScanner